प्रतिवादी क्र.२ तर्फे श्री.उप्पे वकीलामार्फत उलटतपास सुरु.

**०७.** वादीने प्रतिवादी क्र.१ यांना करुन दिलेले खरेदीखत मी वाचले आहे. त्या खरेदीपत्रावर साक्षीदार म्हणून माझी सही आहे. त्या खरेदीपत्रातील मजकुर बरोबर आहे. प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.२ ला करुन दिलेले खरेदीपत्र मी पाहिले आहे. त्यातील मजकूरबाबत मला माहिती नाही. हे खरे की, वाद मिळकतीतून अंबाजोगाई रस्ता गेल्याने या जमिनीच्या आसपासच्या जमिनींच्या किंमती वाढलेल्या आहेत. हे खरे नाही की, वादी आजही ठणठणीत आहे व तिची रोजची कामे करते. वादीने प्रतिवादी क्र.१ ला करुन दिलेल्या खरेदीपत्रात तो विश्वासू बैनामा आहे असा उल्लेख नाही, हे खरे आहे. मी साक्षीस येण्यापुर्वी दाव्याची माहिती पुर्णपणे घेतलेली नाही. हा दावा का दाखल केला आहे, याची मला माहिती आहे. वादीने प्रतिवादी क्र.१ ला विकलेली जमीन वेगळी आणि वादीने संजय शिवपुजे यांना विकलेली जमीन वेगळी आहे, हे खरे आहे. संजय शिवपुजे याच्या जमिनीच्या उल्लेख माझ्या शपथपत्रात का आला हे मला सांगता येत नाही. मी ९ वी उत्तीर्ण आहे. वादी, तिचा मुलगा लक्ष्मण चाटे व मंचक बोंडगे यांच्यात झालेल्या व्यवहाराची मला माहिती आहे असा उल्लेख त्यांच्यातील तोंडी व्यवहार झाला असल्याने मला माहिती आहे. मला साक्षी-समन्स नाही. मी साक्षीदार असल्यामुळे न्यायालयात आलो. बाबु चाटेकडून वादी उसणे पैसे घेत असे या संदर्भाने माझ्याकडे पुरावा नाही.

**०८.** दावा मिळकत वादीला मृत्युपत्राने आली याबद्दल मला काही माहिती नाही. प्रतिवादी क्र.१ ची वादीने त्याला करुन दिलेल्या खरेदीपत्राच्या आधारे ग्रामपंचायतसदरी व फेरफारसदरी नोंद झाली, हे खरे आहे. हे खरे की, प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.२ ला करुन दिलेल्या खरेदीपत्राची मला माहिती नाही. प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.२ ला कोणत्या कायदेशीर कारणासाठी ती जमीन विकली याची मला माहिती नाही. वादीने संजय शिवपुजे याला करुन दिलेल्या खरेदीपत्रावर मी साक्षीदार नाही, हे खरे आहे. हे खरे की, प्रतिवादी

क्र.१ ने प्रतिवादी क्र.२ ला करुन दिलेल्या खरेदीपत्रावर मी साक्षीदार नाही. हे खरे की, प्रतिवादी क्र.२ ने प्रतिवादी क्र.१ कडून खरेदी घेतलेली जमीन कोणती कागदपत्रे पाहून घेतली हे मला माहित नाही. हे खरे नाही की, वादीने प्रतिवादी क्र.१ कडून व्याजाने रक्कम घेतल्याचे मी खोटे सांगतो. हे खरे नाही की, त्या पैशांच्या सुरक्षिततेपोटी तिने प्रतिवादी क्र.१ ला खरेदीपत्र करुन दिले हे मी खोटे सांगत आहे. हे खरे नाही की, शपथपत्रातील मजकुर ऐकीव माहितीच्या आधारे लिहिला. हे खरे की, वादीने स्वत:ची जमीन अनेकांना विक्री केलेली आहे. हे खरे नाही की, वादीने प्रतिवादी क्र.१ ला करुन दिलेले खरेदीपत्र हे कायमचे खरेदीपत्र आहे. हे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**प्रतिवादी क्र.२ साठी उलटतपास पुर्ण.**

**प्रतिवादी क्र.१ च्या लेखी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

**श्रवणोत्तर स्विकृत**

समक्ष

स्वाक्षरीत/-

**( एस.एन.सरडे )**

**दिनांक:०७/०१/२०२६.** **दिवाणी न्यायाधीश व.स्तर, अहमदपूर.**